# ओझर विमानसेवेला भरघोस प्रतिसाद

## मे महिन्यात ४२ टक्क्यांची विक्रमी वाढ

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकच्या ओझर विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. यंदाच्या मे महिन्यात एकूण ३७,५०९ प्रवाशांनी या विमानसेवेचा लाभ घेतला. ही संख्या गेल्या वर्षी मे महिन्याच्या तुलनेत तब्बल ४२ टक्क्यांनी वाढली आहे, अशी माहिती निमाच्या एव्हिएशन कमिटीचे चेअरमन मनीष रावल यांनी दिली. ओझर विमानतळावर सध्या इंडिगो कंपनीच्या माध्यमातून दिल्ली, अहमदाबाद, गोवा, हैदराबाद, बंगळुरू आणि नागपूर या शहरांसाठी नियमित सेवा सुरू आहे. विशेष म्हणजे नागपूर मार्गाला गेल्या वर्षभरात उत्तम प्रतिसाद मिळाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### सिंहस्थ आणि विमानतळाचा विस्तार

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर ओझर विमानतळाच्या सुविधांमध्ये मोठा विस्तार करण्यात येणार आहे. यामध्ये मुख्य धावपट्टीसह एक पर्यायी धावपट्टी तयार केली जात आहे. याशिवाय, पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याचे काम सुरू आहे.

यामुळे सिंहस्थादरम्यान नाशिककडे देशभरातून आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही मोठ्या प्रमाणात प्रवासी आकर्षित होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ओझर विमानतळाच्या विकासामुळे नाशिकच्या आर्थिक आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

### विमानसेवेच्या वाढत्या संधी

विमानसेवेतील वाढीचा कल लक्षात घेता नजीकच्या काळात नाशिकहून नवीन शहरांसाठी सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. यामुळे नाशिकचे देशातील इतर प्रमुख शहरांशी हवाई संपर्क अधिक बळकट होणार आहे.

### उडान योजनेनंतरही टिकवली सेवा

केंद्र सरकारची उडान योजना संपल्यानंतरदेखील नाशिकच्या विमान सेवेला कोणतीही बाधा झाली नाही. उलट प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत आहे. याचे श्रेय स्थानिक प्रशासन, विमान कंपन्या आणि प्रवाशांच्या सकारात्मक प्रतिसादाला दिले जात आहे.

### महत्त्वाचे आकडे

मे २०२४: २६,४५० प्रवासी
मे २०२५: ३७,५०९ प्रवासी
वाढ: ४२%

## आजचे कार्यक्रम

✻ नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची विशेष साधारण सभा कालिदास कला मंदिर येथे दुपारी एकला. सभा संपल्यानंतर दुपारी ३ वाजता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर पत्रकार परिषद घेणार.

✻ नाशिक जिल्ह्यात एडीआपी योजनेंतर्गत अलिम्को मुंबई यांच्याकडून दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेंतर्गत मोफत कृत्रिम अवयव पुरविण्यासाठी पूर्व तपासणी तालुकास्तरीय शिबिर दिंडोरी तालुका येथे खंडेराव मंदिर सभागृह, कसबे वणी ग्रामपंचायत कार्यालया शेजारी.

✻ नाशिक सेवा समितीतफ ४ ते ६ जुलै दरम्यान नाशिकमध्ये श्री हनुमंत चरीत्र एक विवेचन या विषयावर आचार्य श्री हरीकृष्ण महाराज यांचे प्रवचन जुना गंगापूर नाका येथील शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृहात सायंकाळी सातला.

# राज्य बँकेच्या 'सहकार भक्ती रथाचे' मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शनिवारी लोकार्पण



**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस प्रदान करण्यात आलेल्या 'सहकार भक्ती रथाचे' लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी सायंकाळी पंढरपूर येथे होणार आहे.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. यामध्ये वृध्द, दिव्यांग व गरोदर महिलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असतो. सध्या प्रशासनाने मंदिर परिसरामध्ये 'नो व्हेईकल झोन' केल्यामुळे अशा भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मंदिर समितीने या भक्तांसाठी सेवाभावी तत्वावर एक 'ई-बस' देण्याची विनंती राज्य सहकारी बँकेस केली होती. राज्य सहकारी बँकेने पंढरपूर मंदिर समितीची विनंती तातडीने मान्य करत त्यांच्या सुचनेनुसार एक 'ई-बस' मंदिर समितीस देण्याचा निर्णय घेतला. ही संपूर्ण वातानुकुलित बस असून सोळा भक्तांची आसन व्यवस्था यात आहे. हैद्राबाद येथील मे. तेजस्वी गृप या कंपनीने या बसची निर्मिती केली आहे.



यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. या सहकार वर्षात राज्यातील सहकार क्षेत्राची शिखर संस्था असलेल्या राज्य सहकारी बँकेतर्फे सेवाभावी तत्वावर ही बस भक्तांच्या सेवेत दिली जात असल्याने या बसचे नामकरण 'सहकार भक्ती-रथ' असे करण्यात आले आहे.

■ विद्याधर अनास्कर, प्रशासक, राज्य सहकारी बँक

### अनंत ढगे यांची निवड

**नाशिक ।** श्री समर्थ सद्गुरु महाराज ढगे महाराज ट्रस्टचे बैठक ज्येष्ठ गुरुबंधू माधवराव फुले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ट्रस्टच्या अध्यक्षपदी अनंत गोपीनाथ ढगे यांची निवड करण्यात आली. बैठकीस शरद धोंगडे, राजाराम दुकळे, बाळकृष्ण पवार, श्रीकांत ढगे, शंकर मंडलिक, संजय ढगे आदी उपस्थित होते.

# वसतिगृहातील सुविधांवर जनजाती छात्रावासचा वॉच

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यातील आदिवासी वसतिगृहांमध्ये पुरवण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा दर्जा उत्तम राखण्यासह वसतिगृहाच्या अंतर्गत कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी जनजाती छात्रावास विकास समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे.

आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ होण्यासाठी विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यान्वित करण्यात आले आहे. सद्यस्थिती राज्यात ४९० शासकीय वसतिगृहे आहे. त्यापैकी २०६ वसतिगृहे मुलींची तर २८४ वसतिगृहे मुलांची आहेत. या वसतिगृहांची विद्यार्थी क्षमता ५८ हजार ७०० इतकी आहे. वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निर्वाह आणि इतर भत्ते डीबीटी स्वरुपात दिले जातात.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्तावाढ, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, स्वच्छता आणि आरोग्य, विद्यार्थ्यांची सुरक्षा, मूलभूत सुविधाचे नियोजन आदींसाठी प्रत्येक वसतिगृहात जनजाती छात्रावास विकास समिती कार्यरत असणार आहे. समितीचे किमान दोन सदस्य महिन्यातून एकदा वसतिगृहाला भेट देऊन सोई-सुविधांची पाहणी करणार आहे. दर तीन महिन्यांत एकदा समितीची बैठक होऊन तिथे विविध विषयांवर चर्चा केली जाणार आहे.

### अशी असणार समिती

जनजाती छात्रावास विकास समितीमध्ये पालक प्रतिनिधीमधून अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडण्यात येईल. गृहपाल/गृहप्रमुख हे सदस्य सचिव असणार आहे. याशिवाय ३ पालक प्रतिनिधी आणि ३ विद्यार्थ्यांचा समावेश राहील. ५ पैकी २ पालक प्रतिनिधी महिला असणार आहे.

### मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

**नवीन नाशिक ।** परिसरात दिवसेंदिवस मोकाट कुत्र्यांचा त्रास वाढत असल्याने नागरिक तसेच वाहनचालकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

## स्थानिक भाव

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | ९७,८०० |
| २२ कॅरेट | ८९,९८० |
| चांदी (प्रति किलो) | |
| १०८००० | |

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३,२३९ |
| | (-१७०) |
| निफ्टी | २५,४०५ |
| | (-४८) |

## बाजार भाव

### कालचे कांदा भाव

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| लासलगाव | १६६१८ | ६०० | २१२० | १५०० |
| विंचूर | १५७३२ | ६०० | १८६१ | १५०० |
| निफाड | ३९६८ | ५०० | १६१० | १४७५ |
| सायखेडा | १५७० | ७०० | २०५१ | १५०० |
| पिंपळगाव | २०००० | ७०० | २१०६ | १५०० |

# कांद्याला काजळीने ग्रासले

**नाशिक । प्रतिनिधी**

हवेत आर्द्रता वाढलेली असल्यानेआणि कांदा काही प्रमाणात ओला झालेला असल्याने शेतकऱ्यांना कांद्याची अधिक देखभा करावी लागत आहे. हवेतीतील ओलाव्याची कांद्याला झभ बसत आहे. कादयाचा सर्वात वरचा पापुद्रा ओला झाल्याने त्या जागी कांद्याला काजळी लागत आहे. त्यामुळे त्याचा कांदा दर्जावर परिणाम होऊन भावामध्येही शेतकऱ्यांना झळ बसत आहे.

### फळभाज्यांचे प्रती जाळी दर

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| टोमॅटो | २०० | ४०० | ३०० |
| वांगी | ८०० | १००० | ९२५ |
| फ्लॉवर | १०० | २०० | १७५ |
| कोबी | १०० | २०० | १७५ |
| ढोबळी | ४०० | ६०० | ५२५ |
| कारले | ८०० | १००० | ९५० |
| दोडका | ८५० | ११०० | ९५० |
| गिलके | ९०० | १००० | ९६० |
| भेंडी | ६०० | ८०० | ७०० |
| गाजर | ६०० | ९०० | ७०० |
| काकडी | ५०० | ८०० | ७०० |

# कोबी, फ्लॉवर दर गगनाला

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तीन्ही सत्रात फळभाज्यांची आवक घटलेली आहे. यार्डात ही उणीव भरून काढण्यासाठी व्यापारी वांगे, कारले, भेंडी खरेदी दूसऱ्या राज्यातून मालमागवत आहे. सर्वाधिक दर आज लिलावात कोबी आणि फ्लॉवर होते. दहा कंदाच्या फ्लॉवरच्या एका गाठोडेच्या दर २५० ते ३५० रुपये तर सरासरी १७५ रुपये भाव होता. कोबीचे एक कॅरेट २०० ते ३०० रुपये दराने विक्री होत होते. मिरची, लिंब, आद्रक याचे भार जाद असले तरी ते त्यापेक्षा अधिक दर हा कोबीला होता. कोअबीच १२ कंदाचे एक कॅरेट २०० ते ३०० रुपये सरासरी २०० रुपये दराने विक्री झो.

# अहंकार बाजूला ठेवा

**(पान १ वरून)** ओढावा हेच सरकारचे व्हिजन आहे काय? असा सवाल जाधव यांनी केला. शेतकऱ्यांप्रती सरकारमध्ये प्रेम, कणव काहीच नाही. त्यामुळे जाहिरातीबाजी करून निवडणुका जिंकता येतात पण त्याने राज्याची प्रगती होत नाही, असेही त्यांनी सरकाराला सुनावले.

मायबाप सरकारमधील मंत्री शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांची कुचेष्टा करतात, टिंगलटवाळी करतात. मंत्री शेतकऱ्यांना म्हणतात की कर्जाच्या पैशातून तुम्ही मुलीचा साखरपुडा करता. शेतकऱ्यांनी आपल्या मुलांच्या लग्नाचे स्वप्न पाहायचे नाही काय? मंत्र्यांच्या अशा भाषेतून त्यांचा अहंकार दिसतो. खरेतर सरकारने लगडलेल्या फळांच्या झाडाप्रमाणे नम्र असायला हवे. पण मंत्री शेतकऱ्यांचा अवमान करत असताना त्यांच्या वरिष्ठांकडून त्यांचे कान टोचले जात नाहीत, अशी खंत जाधव यांनी व्यक्त केली. सरकारने अडचणीत सापडलेल्या शेतकरी, बागायतदार, मच्छिमार यांच्या मदतीसाठी पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली.



आषाढी एकादशीनिमित्त गोदावरी किनारी विठ्ठल-रखुमाई प्रतिमेचे मनोभावे पूजन करतांना चिमुरडी

(छाया -सतिश देवगीरे)

# राज्यात २४ तास वाळू वाहतुकीला परवानगी

**(पान १ वरून)** येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही. त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनिज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. वाळू वाहतुकीच्या पारदर्शकतेसाठी सरकारने विविध उपाययोजना केल्या असून, प्रत्येक वाळूघाटाचे जिओ-फेन्सिंग केले जाणार आहे. तसेच घाट आणि वाहतूक मार्गांवर सीसीटीव्ही बसवले जाणार आहेत. राज्यात नैसर्गिक वाळूची मर्यादा लक्षात घेऊन सरकारने कृत्रिम वाळू धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार असून त्यासाठी पाच एकर जमीन दिली जाणार आहे. तीन महिन्यांत एक हजार क्रशर युनिट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट असल्याचे बावनकुळे म्हणाले.


# हायव्होल्टेज राजकारण

**(पान १ वरून)** अधोरेखित केला होता. यानंतर भाजपने सुनील बागुल आणि मामा राजवाडे यांच्या पक्षप्रवेशाला तूर्तास ब्रेक दिला. मामा राजवाडे यांना ठाकरे गटाने महानगरप्रमुख केल्यानंतर नाशिक पोलिसांनी एका मारहाण प्रकरणात सुनील बागुल आणि राजवाडे यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झालेल्या या दोघांना भाजप पावन करून घेणार ही बातमी आली. फरार असलेल्या आरोपींचा भाजपमध्ये प्रवेश झाल्यास राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. या सगळ्याचा सारासार विचार करून भाजप नेतृत्वाने तूर्तास दोघांच्या पक्षप्रवेशाला स्थगिती दिली.

# कुरिअर बॉयच्या वेशात तरुणीवर अत्याचार

**(पान १ वरून)** डोअर उघडले. तेव्हा त्याने कुरिअर कंपनीतील कामगार असल्याचे सांगितले आणि बँकेचे कुरिअर आहे असे सांगितले. तरुणीने त्याला कुरिअर माझे नसल्याचे सांगितले. त्यावेळी त्याने कुरिअर कागदपत्रांवर स्वाक्षरी करावी लागेल, असे तिला सांगितले आणि दरवाजा उघडण्यास भाग पाडले. तरुणीला बोलण्यात गुंतवून आरोपीने तिच्या चेहऱ्यावर अचानक स्प्रे मारला. स्प्रे मारल्यानंतर तिचे डोळे जळजळले. त्यानंतर आरोपी तरुण घरात बळजबरीने शिरला.त्याने तरुणीला धमकावून तिच्यावर बलात्कार केला. पसार झालेल्या आरोपीने मोबाईलमध्ये तरुणीचे आक्षेपार्ह छायाचित्र काढले आहेत. मी परत येईल, असा मेसेजदेखील मोबाईलमध्ये लिहिला आहे, असे पीडित तरुणीने फिर्यादीत सांगितले आहे.

## शब्दकोड :२९१



**आडवे शब्द :** १) देवकीचा पुत्र श्रीकृष्ण ६) अहंकार ७) स्वस्त च्या विरूद्ध ९) घाव १०) नवऱ्याचा भाऊ ११) कचेरीत काम करणारा १३) दात १५) सोसाट्याचा वारा १६) दफन भूमी १८) संगीतातील एक राग २०) माल साठवण्याची जागा २१) बोकड २२) नभ २३) दारू, चरस, गांजा इत्यादी २७) करंजी, मोदका मधील गोड पदार्थ २८) रोखणे, पुढे न जाऊ देणे ३०) पाणी ३१) दारूचा एक प्रकार ३३) हलत डूलत चालणे ३४) मान्यतेचा शब्द ३५) डोके (ग्रा) ३७) घासणे (इ.) ३८) पठण ४०) पुन्हा ४२) खराब ४३) विचित्र ४४) पुरूष ४५) आवाज, व्यसन, छंद ४६) सरळ लांब बांबू ४७ अ) पद्धत ४९) कारस्थान ५१) शक्ती ५४) भारतीय चलन ५६) बोबडी वळणे ५८) हवा, वारा ५९) सरोवर ६०) तृष्णा ६१) घोडे बांधण्याची जागा ६२) पाठविलेला ६४) खळबळ जनक ६६) मागणारा, याचक ६९) नक्की, खात्रीने ७१) धातूचा धागा ७२) मुंग्या, नाग आदींनी निवासासाठी बांधलेले घर ७३) काढलेली सुट्टी ७४) ढगाळ वातावरण

**उभे शब्द :** १) मंदिर २) आशीर्वाद ३) शंकराचे वाहन ४) दार ५) नशीब, काम ६) निर्धन ७) कामदेव ८) हत्तींचा राजा ११) हळहळणे १२) पांढरपेशी १३) सडक १४) आपले राष्ट्रगीत १७) धोबी १९) सुसर २१) द्रव्य, पैसा २४) माणशी प्रमाण २५) आपले नसलेले (लोक) २६) किंमत २७) लाकडाची एक उत्कृष्ट जात २८) रेश्मी पदराचे वस्त्र २९) एक जंगली फूल ३२) कारण ३६) शिजूनही कडक राहीलेला ३७) मातीचा कण ३९) नशा आणणारा एक पदार्थ ४१) बारा वर्षाचा काळ ४२) वाहून नेणारा ४३) पश्चाताप ४७) रात्र ४८) मोठा डेरेदार वृक्ष ५०) पडणे ५२) धमकी ५३) शिवाजी राजांना तलवार देणारी देवी ५५) वेदना, त्रास ५७) संत्र, लिंबू सारखे मोठे फळ ५९) लकडा ६१) जल ६३) मुंग्यांचे घर ६४) जिवलग मित्र ६५) श्रीफळ ६७) मगज ६८) जाडसर पीठ ६९) प्रत्येक, शंकर ७०) मौज, गंमत

### शब्दकोड२९०चे उत्तर

